श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## : विषय:

**डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD), हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HH MD) व बॅगेज स्कॅनर यंत्रणा भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत.**

---

दि. १२ ऑगस्ट २०२५, दि. ६ जानेवारी २०२६, तसेच १ जानेवारी २०२६ नुतन वर्षानिमित्त न्यासातर्फे रांग व्यवस्थापनेसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपामध्ये भाविकांच्या सुरक्षतेसाठी डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD), हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) व बॅगेज स्कॅनर यंत्रणा भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

---

| | |
|---|---|
| दरपत्रके सुचना प्रसिध्दीचा वार व दिनांक | – शनिवार, २६ जुलै, २०२५ |
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – बुधवार, ३० जुलै, २०२५, सांय ०५.०० वा. पर्यंत. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | – गुरुवार, ३१ जुलै, २०२५, दु ०१.०० वा. |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

Sawant 26/07/2025

(मनाली सांवत)
वित्त व लेखा अधिकारी

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org



| अ. क्र. | तपशील | परिशिष्ट क्र. | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १ | दरपत्रके मागविण्यासंदर्भातील अटी व शर्ती (Ruls and Regulation) | परिशिष्ट १ | ३ ते ६ |
| २ | दरपत्रकधारकाबाबतची माहिती (Bidder Particulars) | परिशिष्ट २ | ७ |
| ३ | तीन वर्षाचे आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र (१० लक्ष पेक्षा जास्त असावे.) सी. ए. यांचे लेटरहेडवर | परिशिष्ट ३ | ८ |
| ४ | दरपत्रकधारकाने (Technical Bid) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी | परिशिष्ट ४ | ९ |
| ५ | दरपत्रकाचा तपशील BOQ (Proforma for Price Scheduled) | परिशिष्ट ५ | १० |

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# अटी व शर्ती (Ruls and Regulation)

## "परिशिष्ट १"

१. दि. १२ ऑगस्ट २०२५, दि. ६ जानेवारी २०२६, तसेच १ जानेवारी २०२६ नुतन वर्षानिमित्त न्यासातर्फे रांग व्यवस्थापनेसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपामध्ये भाविकांच्या सुरक्षतेसाठी डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD), हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) व बॅगेज स्कॅनर यंत्रणा भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२. उक्त कामासाठी तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मुल्य दर (BOQ) असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व मुल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे लिफाफे सादर करावयाचे आहे.

३. लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रकधारक हा श्रीसिध्दिविनायका प्रति आस्था असणारा असावा.

५. तांत्रिक कागदपत्रांच्या लिफाफ्यामध्ये पान क्र. ९ वरील परिशिष्ट ४ नुसार सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक असेल.

६. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीतमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे बंधनकारक आहे.

८. दरपत्रकधारकारांनी सर्व BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. कर, लेबर मजूरी व वाहतूक खर्च इ.) मुल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

९. दरपत्रकधारकाची फर्म/कंपनी किमान ३ वर्षापुर्वीची असणे आवश्यक आहे.

१०. सदर कामासाठी वापरण्यात येणारे डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD), हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) व बॅगेज स्कॅनर यंत्रणा सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) चार्जिंग करण्यासाठी लागणारे साहित्य सोबत घेउन येणे आवश्यक आहे.

११. नेमणूक करण्यात येणारे बॅगेज स्कॅनर ऑपरेटर हे प्रशिक्षीत असावे.

# अटी व शर्ती (Ruls and Regulation)

## "परिशिष्ट १"

१. दि. १२ ऑगस्ट २०२५, दि. ६ जानेवारी २०२५, दि. ५ मे २०२६ रोजी येणाऱ्या अंगारक संकष्ट चतूर्थीच्या दिवशी तसेच १ जानेवारी २०२६ नुतन वर्षानिमित्त न्यासातर्फे रांग व्यवस्थापनेसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपामध्ये भाविकांच्या सुरक्षतेसाठी डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD), हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) व बॅगेज स्कॅनर यंत्रणा भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२. उक्त कामासाठी तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मुल्य दर (BOQ) असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व मुल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे लिफाफे सादर करावयाचे आहे.

३. लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रकधारक हा श्रीसिध्दिविनायका प्रति आस्था असणारा असावा.

५. तांत्रिक कागदपत्रांच्या लिफाफ्यामध्ये पान क्र. ९ वरील परिशिष्ट ४ नुसार सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक असेल.

६. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीतमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे बंधनकारक आहे.

८. दरपत्रकधारकारांनी सर्व BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. कर, लेबर मजूरी व वाहतूक खर्च इ.) मुल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

९. दरपत्रकधारकाची फर्म/कंपनी किमान ३ वर्षापुर्वीची असणे आवश्यक आहे.

१०. सदर कामासाठी वापरण्यात येणारे डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD), हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) व बॅगेज स्कॅनर यंत्रणा सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) चार्जिंग करण्यासाठी लागणारे साहित्य सोबत घेउन येणे आवश्यक आहे.

११. नेमणूक करण्यात येणारे बॅगेज स्कॅनर ऑपरेटर हे प्रशिक्षीत असावे.

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

## "परिशिष्ट १"

१२. काम सुरू करण्यापुर्वी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या सर्व नियम व सुचनांचे पालन करणे (उदा. या कामासाठी लागणारे विविध परवाने व सुरक्षिततेचे नियम) कंत्राटदारावर बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१३. बॅगेज स्कॅनरवर नेमणूक करण्यात येणाऱ्या ऑपरेटरची एक शिफ्ट ९ तासांची असेल.

१४. दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने इतरत्र काम केलेल्याचा अनुभव असावा. यासंबधातील प्रमाणपत्र/दाखला किंवा कार्यदिशाची प्रत तांत्रिक लिफाफ्या मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

१५. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील १९२३ तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडन्ट फंड अॅक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन अॅक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. उक्त कायद्यातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१६. आपल्यामार्फत नेमणुक करण्यात आलेले ऑपरेटर किंवा कर्मचारी कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

१७. कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन किंवा सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाची चूक झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. या कामासाठी लावण्यात येणारे कर्मचारी/कामगारांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक कार्यक्रमाच्या पूर्वी किमान

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

## “परिशिष्ट १”

८ दिवस अगोदर पोलीस व्हेरिफिकेशन केल्याचे प्रमाणपत्र न्यासास सादर करणे आवश्यक राहील. त्याच आधारावर कामगारांना तात्पुरते ओळखपत्र देण्यात येईल.

१८. कंत्राटदाराने नियुक्त केलेली पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील.

१९. काम सुरू असताना निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारच्या मालमत्तचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाईची रक्कम आपल्या बिलातून वजा करण्यात येईल.

२०. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णत:/अंशत: बयांना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल त्याबाबत न्यासाचा निर्णय अंतिम राहील.

२१. लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्ततां न केल्यास, तसेच असमाधानकारक काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत न्यासाचा निर्णय अंतिम राहिल.

२२. सर्व अटी व शर्ती या कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. सदर अटींचा भंग झाल्यास किंवा सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत अधीन राहील.

२३. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास L-1 दरपत्रकधारकाराचे काम असमाधानकारक असल्यास आवश्यकतेनुसार L-2 दरपत्रकधारकाराला कार्यादेश देवू शकतो.

२४. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह जी. एस. टी समाविष्ट करून रक्कम भरावी.

२५. प्रत्येक कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर नियमानूसार बिलाची अदायगी करण्यात येईल.

२६. कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

२७. बीलामध्ये मुळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कर कपात केली जाईल.

२८. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२९. कामाचा पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

## "परिशिष्ट १"

३०. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कामामध्ये ५% ते १०% काम कमी जास्त प्रमाणात कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

३१. दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे.

३२. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

३३. दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप. कंत्राटदारास काम न देता सदरील स्वतः करणे बंधनकारक राहील. उप कंत्राटदारास काम दिल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

३४. न्यासाने नेमुन दिलेली कामे ठरलेल्या वेळेत करत नसल्यास, कामात चालढकल करत असल्यास, अथवा समाधानकारक काम करत नसल्यास न्यासकडून कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राटदारास दिलेल्या कामाचे कंत्राट रद्द करण्यात करणेत येईल.

३५. कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

३६. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

३७. दरपत्रक सुचना अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्याचा किंवा आवश्यक बदलासह फेर दरपत्रके मागविण्याचा पूर्णतः अधिकार खरेदी उप समितीस राहील.

३८. दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**अ. श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९९३०९४२४२८**
**ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९३२४९९९०९४**
**क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११**
**ड. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय**
**दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई -४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकधारकाबाबतची माहिती

## "परिशिष्ट २"

दरपत्रकधारक/फर्मचे नांवः-----------------------------------------------------------

पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ताः-----------------------------------------------------

-----------------------------------------------------------

दुरध्वनी क्र. (कार्यालय):-------------------- (निवास):--------------------

ई–मेलः-----------------------------------------------------------

संपर्कासाठी प्रतिनिधीचे नावः-----------------------------------------------------

संपर्कासाठी प्रतिनिधीचा मो. क्रः-----------------------------------------------------

कंपनी नोदणी दाखला क्रः-----------------------------------------------------

पॅन कार्ड क्रः-----------------------------------------------------

जी. एस. टी. नोंदणी क्रः-----------------------------------------------------

बॅकेचे नांव :-------------------- बॅक खाते क्रः--------------------

आय एफ सी कोडः--------------------

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

(सी. ए. यांचे लेटरहेडवर)

## परिशिष्ट ३

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

महोदय,

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------------यांच्या व्यवसायाची वर्ष २०२२—२३, २०२३—२४, २०२४—२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२२—२३ | |
| २ | वर्ष २०२३—२४ | |
| ३ | वर्ष २०२४—२५ | |
| **एकूण तीन वर्षाची आर्थिक उलाढाल** | | |

दिनांक :—　　/　　/ २०२५

ठिकाण :—

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊटंन्ट
(नाव/सही शिक्का)

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकधारकाने तांत्रिक व मूल्य लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे

### "परिशिष्ट ४"

**अ) तांत्रिक लिफाफा**

०१. कंपनी नोंदणी दाखला **(महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)** किमान ३ वर्षे

०२. आयकर नोंदणी पॅन कार्ड

०३. जी. एस. टी. नोंदणी दाखला

०४. मागील ३ वर्षाचे आय. टी. आर. रिटर्नस फाईल प्रत (सन २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५)

०५. दरपत्रकधारकाबाबतची माहिती **(परिशिष्ट २ नुसार)**

०६. सी. ए. यांचे लेटरहेडवर मागील ३ वर्षाच्या आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र **(परिशिष्ट ३ नुसार)**

०७. अनुभवाचा दाखला **(परिशिष्ट १ मधील अनुक्रमांक १४ नुसार)**

**ब) मूल्य लिफाफा**

०१. मूल्य दर **(परिशिष्ट. ५ नुसार)**

**टिप – दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रके उघडण्याच्या बैठकीस उपस्थित राहता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## "परिशिष्ट ५"

## मुल्य दरपत्रक

| दि. १२ ऑगस्ट २०२५ (अंगारक संकष्ट चतुर्थी) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | प्रति दर | एकूण संख्या | एकूण दर (सर्व करांसहित) |
| १ | डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD) | | १२ | |
| २ | हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) | | २० | |
| ३ | बॅगेज स्कॅनर ऑपरेटरसह (3 Shift) | | २ | |
| | | | (A) | |
| दि. १ जानेवारी २०२६ (नुतन वर्ष) | | | | |
| अ. क्र. | तपशील | प्रति दर | एकूण संख्या | एकूण दर (सर्व करांसहित) |
| १ | डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD) | | १२ | |
| २ | हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) | | २० | |
| ३ | बॅगेज स्कॅनर ऑपरेटरसह (3 Shift) | | २ | |
| | | | (B) | |
| दि. ६ जानेवारी २०२६ (अंगारक संकष्ट चतुर्थी) | | | | |
| अ. क्र. | तपशील | प्रति दर | एकूण संख्या | एकूण दर (सर्व करांसहित) |
| १ | डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर (DFMD) | | १२ | |
| २ | हॅन्ड हेल्ड मेटल डीटेक्टर (HHMD) | | २० | |
| ३ | बॅगेज स्कॅनर ऑपरेटरसह (3 Shift) | | २ | |
| | | | (C) | |
| | | | एकूण दर सर्व करांसहित (A) + (B) + (C) | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का